Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लोकांचे मजुरीसाठी होणारे स्थलांतर एक अभ्यास

**संशोधक विद्यार्थी**
**श्री. गणेश दौलत भोये**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर.
Email- ganeshbhoye0096@gmail.com

**मार्गदर्शक**
**डॉ. लक्ष्मीकांत चोपकर**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर

---

**प्रस्तावना :**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे उलटली, तरी आदिवासींचे पोटापाण्यासाठी स्थलांतर चालूच आहे. आदिवासींच्या पिढ्यान पिढ्या त्यामुळे अज्ञानी, अशिक्षित, गरीबच राहिल्या. कोणत्याही सरकारने हे स्थलांतर थांबविण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. पोटाची खळगी भरण्यासाठी आदिवासी बांधवांची भटकंती सुरूच आहे. हा वनवास कधी संपणार? राज्यातील किती आदिवासी पोटासाठी स्थलांतर करतात, याचे रेकॉर्डही नाही. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी गावे, पाडे ओसाड पडलेले दिसतात. आदिवासी सुरगाणा, पेठ तालुक्यात पिण्याच्या पाण्याची व सिंचनाची टंचाई आहे. या भागात एकही मोठा सिंचन प्रकल्प नसल्याने केवळ एक ते दोन टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे. सिंचनाची सुविधा उपलब्ध नसल्याने तालुक्यातील बहुतांश नागरिक उन्हाळ्यात रोजगारासाठी दुसऱ्या जिल्ह्यांतही स्थलांतरित होतात.

रोजगारासाठी गाव, तालुका सोडून शेजारच्या तालुक्यात कामाला जाण्यासाठी सुरगाणा तालुक्यातील आदिवासी शेतमजुरांची सध्या धावपळ सुरू आहे. सध्या निफाड, दिंडोरी, नाशिक तालुक्यांत द्राक्ष व कांदा लागवडीचा हंगाम सुरू आहे. काही महिन्यांसाठी मजूर मुलांच्या शिक्षणाची पर्वा न करता, संसार उघड्यावर ठेवून एक-दोन महिने पुरेल एवढी स्वयंपाकासाठी लागणारी लाकडे, भांडी, धान्य, कपडे, अंथरूण पांघरूण गोणीत बांधून डोक्यावर बिरहाड घेऊन वणी, खेडगाव, पिंपळगाव, विंचूर, दिंडोरी, निफाड, येवला व नाशिक मुक्कामी दाखल झाले आहेत. या मजुरांना कसेबसे काम लागले, तर एक मजूर दोनशे ते अडीचशे रुपये रोजाने काम करतो. यात महाविद्यालयीन मुलेही शाळा, कॉलेज सोडून कामासाठी जाताना दिसतात. आई-वडिलांसोबत किंवा मित्रांसोबत मजुरी करून कुटुंबाला हातभार लावून महिन्याचा सुमारे तीन ते चार हजार रुपये मजुरी एकदाच मिळते. वास्तविक सुरगाणा तालुक्यात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने नद्या, नाले तुटुंब भरून वाहतात, पण पाणी अडविण्याचे कोणतेही नियोजन नसल्याने पाणी गुजरातकडे वाहून जाते. तालुक्यातील पाझर तलाव, शेततळे, सिमेंट बंधारे, पाणी अडवा पाणी जिरवा, जलयुक्त शिवार यांसारख्या योजना निकृष्ट आहेत. या कामाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

शेतजमिनी ओलिताखाली येणे गरजेचे आहे. सुरगाणा पेठ तालुक्यात नद्यांचे पाणी अडवले जात नसल्याने विहिरी व कूपनलिका कोरड्याच राहतात. शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठी पाणीही कोसो दूर डोक्यावरून वाहून आणावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. पावसाळी पीक घेतल्यानंतर कोणतेच पीक होत नाही म्हणून शेतीची कामे आवरून सुरगाण्यातील शेतमजूर, शेतकरी परिवाराला सोबत घेऊन स्थलांतरित होतात. पावसाच्या पाण्यावर

नागली, भात, वरई, खुरसणी, उडीद, तूर व कुळीद ही पिके घेतली जातात. जमीन ओलिताखाली यावी यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

सुरगाणा पेठ तालुक्यात मोठे प्रकल्प होण्याच्या फक्त मागील काही वर्षांपासून आदिवासी बांधव घोषणा ऐकत आहोत, ते प्रकल्प कधी होतील? आमचे स्थलांतर कधी थांबेल, हा प्रश्न आम्हाला पडला आहे. का ते फक्त आश्वासन असून, आश्वासनच राहणार आहे? हे आदिवासी तालुके नेहमी आश्वासनाच्या महापुरात वाहून जातो. आदिवासी बांधवांची ही समस्या आहे, सरकारने खरोखर लक्ष देण्याची गरज आहे.

**व्याख्या:**

"स्थलांतरित कुटुंबे म्हणजे ती कुटुंबे जी आपल्या मूळ स्थळावरून इतर ठिकाणी रोजगार, शिक्षण, सामाजिक किंवा पर्यावरणीय कारणांमुळे स्थलांतर करतात. या प्रक्रियेमुळे त्यांच्या जीवनशैलीत, आर्थिक स्थितीत, आणि सामाजिक संबंधांमध्ये महत्त्वपूर्ण बदल होतात."

**हंगामी स्थलांतर :**

आर्थिक उत्पन्नाचा स्रोत कमी झाला तरीही शेती हाच कुटुंबाचा प्राथमिक स्रोत आहे, असे अनेक दुष्काळग्रस्त मानतात. पण उपजीविकेसाठी शेती पुरी पडत नाही म्हणून आदिवासी तालुक्यातील लोक पाच-सहा महिन्यासाठी हंगामी स्थलांतर करतात. यात पेठ, सुरगाणा तालुक्यातील मजुरांचे प्रमाण जास्त आहे. बागायती परिसरात देखील पावसाळा हंगाम संपल्यावर शेतीतील कामांसाठी मजुरांची कमतरता निर्माण होते. ती कमतरता या स्थलांतरित मजुरांच्या माध्यमातून भरून काढली जाते. शेतीचे काम हे स्थलांतरित मजूर करतात. दिवसेन दिवस मजुरांची संख्या वाढत आहे. मुळात हंगामी स्थलांतर करणारे मजूर कोण? कोरडवाहू-दुष्काळी पट्ट्यातील भूमिहीन, अल्पभूधारक, निरीक्षर, अर्ध-कौशल्य असलेले शेतकरी-शेतमजूर यांचा त्यात समावेश होतो. या मजुरांची उपजीविका पूर्णपणे शेतीवर अवलंबून असते. मात्र पाऊस कमी झाला की शेतीतील उत्पन्नात घसरण होते. तसेच रोजगाराचे पर्याय देखील मिळत नाहीत. परिणामी लोकांना स्थलांतर करावे लागते.

**आदिवासी लोकांची जीवनशैली :**

**सामाजिक जीवन:**

आदिवासी लोक समूहा मध्ये राहतात (Community Living) तत्वावर जीवन जगतात. गावपातळीवरील मुखिया म्हणून सरपंच, पोलिस पाटील, नाईक पंच समाजाची जबाबदारी सांभाळतात. विवाह आपल्या जाती मध्येच करतात. आदिवासी नृत्य ढोल, पावरी आहे. सण-उत्सव यांना त्यांच्या जीवनात विशेष स्थान आहे.

**आर्थिक जीवन:**

आदिवासी समाज पारंपरिक व्यवसाय म्हणजे शेती आहे तसेच जंगलातील संसाधने, आणि हस्तकलेवर अवलंबून असतो. आधुनिक औद्योगिकीकरणामुळे काही भागांमध्ये स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे. मुख्य

व्यवसाय–कृषी हा आहे. दुय्यम कुकुटपाळण व मजुरी इ व्यवसाय करतात. आपले उदारनिर्वाह करतात. आदिवासी भागांमध्ये रोजगाणार उपलब्ध नाही. ज्या कुटुंबाकडे सिंचन व्यवस्था आहे. असे लोक शेती करतात आणि यांच्या कडे सिंचन व्यवस्था नाही असे लोक आपल्या गावात किंवा दुसऱ्या गावात तालुक्यात जाऊन मजूरी करतात. रोजगार बद्दल अनेक समस्या आदिवासी बंधावणा येतात.

**शैक्षणिक जीवन :**

आदिवासी कोकणा जमातीतील विद्यार्थ्यांचे शिक्षण ८० टक्के विद्यार्थ्यांचे शिक्षण दहावी ते बारावी झालेले आहे. २० टक्के विद्यार्थ्यांचे शिक्षण पदवी, पदवीत्तर शिक्षण झालेले आहेत. काही पालकांची आर्थिक परिस्थिती खालावलेली असल्यामुळे पुढील शिक्षणासाठी आर्थिक समस्या जाणवतात. आपण सुरगाणा आणि पेठ तालुक्याचा विचार केला तर या तालुक्यांमध्ये महाविद्यालयांची कमतरता आहे. जर एका सुरगाणा तालुक्याचा विचार केला तर पदवी, पदवीत्तर शिक्षणासाठी फक्त एक महाविद्यालय आहे. जर एखाद्या डिग्री, डिप्लोमाला प्रवेश घ्यायचं असेल तर नासिक या ठिकाणी जावं लागतं आणि येण्या जाण्यासाठी दळणवळणाच्या साधनांची कमतरता आहे. नाशिक सारख्या ठिकाणी रूम भाड करून राहण्यासाठी पैशांची कमतरता असते. वस्तीगृहामध्ये सर्वांनाच प्रवेश मिळत नाही. अशा अनेक समस्यांना आदिवासी बांधवांना सामोरे जावं लागतं. म्हणून जास्त तर विद्यार्थी दहावी ते बारावीचे शिक्षण करतात आणि रोजगारासाठी स्थलांतर होतात.

त्या ठिकाणी मिळणारे शेतीकाम, उद्योगीकरण, गवंडी काम अशा ठिकाणी हे विद्यार्थी काम करून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करतात. अशा शिक्षणाबद्दल आदिवासी भागामध्ये अनेक समस्या जाणवतात. या आदिवासी भागांमध्ये रोजगाराची कमतरता असल्यामुळे स्थलांतर होण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्यायच राहिलेला नाही.

**साहित्य परीक्षण :**

**लेखक :** सोमनाथ घोळवे

**वर्तमान पत्र :** सकाळ ॲग्रोवन रविवार विशेष पान क्रमांक १४ दिनांक- १४ जून २०२४

**विषय :** दुष्काळामुळे स्थलांतराचा प्रश्न गंभीर

**उद्देश :** कायमस्वरूपी स्थलांतर आणि हंगामी स्थलांतर याबद्दल त्यांनी मत मांडले आहे.

**निष्कर्ष :**

दुष्काळामुळे हंगामी आणि कायमस्वरूपी असे दोन प्रकारचे स्थलांतर घडून येते. एक, शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने पाच-सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मजुरीसाठी-उपजीविकेसाठी अनेक कुटुंबे शेतमजुरीसाठी स्थलांतर करतात, त्यास हंगामी स्थलांतर म्हटले जाते. यात मुख्यतः कोरडवाहू-दुष्काळी भागातून बागायती परिसरात (ऊस उत्पादक परिसर) शेतीतील कामांसाठी स्थलांतर होत आहे. दुसरे, शहरांमध्ये रोजगाराच्या निमित्ताने होणारे कायमस्वरूपी स्थलांतर. या स्थलांतरामध्ये विभागनिहाय वेगळेपण दिसते. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र या विभागातून जास्त प्रमाणावर ग्रामीण भागातून स्थलांतर होण्याचे प्रमाण जास्त आहे. तर पश्चिम

महाराष्ट्रातून कायमस्वरूपी स्थलांतर होण्याकडे कल जास्त आहे. असे त्यांनी सांगितले आहे. या अभ्यासात स्थलांतरीत कुटुंबांची आर्थिक समस्या स्पष्ट दिसते. स्थलांतर होण्यामागील करणे इ.

**लेखक :** मोतिराम भोये.

**वर्तमान पत्र :** जिल्हा नाशिक दैनिक लोकणामा वर्तमान पेपर पान क्रमांक ७

**विषय :** रोजगारासाठी स्थलांतर, कधी संपणार वनवास

**उद्देश :** स्थलांतर आदिवासी बांधवांसाठी त्यांनी मत मांडले आहे.

**निष्कर्ष :**

सुरगाणा पेठ तालुक्यात नद्यांचे पाणी अडवले जात नसल्याने विहिरी व कूपनलिका कोरड्याच राहतात. शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठी पाणीही कोसो दूर डोक्यावरून वाहून आणावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. पावसाळी पीक घेतल्यानंतर कोणतेच पीक होत नाही म्हणून शेतीची कामे आवरून सुरगाण्यातील शेतमजूर, शेतकरी परिवाराला सोबत घेऊन स्थलांतरित होतात. पावसाच्या पाण्यावर नागली, भात, वरई, खुरसणी, उडीद, तूर व कुळीद ही पिके घेतली जातात. शेतजमिनी ओलिताखाली येणे गरजेचे आहे. यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. असे यांनी सांगितले आहे.

**संशोधनाचे उद्देश:**

१. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लोकांचे स्थलांतर करण्यामागील कारणांचा अभ्यास करणे.
२. स्थलांतराचा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक जीवनावर होणारा प्रभाव समजून घेणे.
३. स्थलांतर कमी करण्यासाठी पर्यायी रोजगार आणि सरकारी योजना किती प्रभावी आहेत याचा अभ्यास करणे.
४. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सुचवणे.

**गृहितकृते :**

१. स्थलांतरित आदिवासी कुटुंबे आर्थिकदृष्ट्या अधिक सशक्त होत आहेत, मात्र त्याचा सामाजिक आणि शैक्षणिक परिणाम नकारात्मक आहे.
२. स्थलांतरित कुटुंबांतील मुले नियमित शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहू शकत नाहीत, ज्यामुळे त्यांचे भविष्यातील रोजगाराच्या संधी कमी होतात.
३. स्थलांतरित मजूर आणि त्यांचे कुटुंब आरोग्याच्या समस्यांना अधिकाधिक सामोरे जातात, कारण त्या भागात पुरेशा आरोग्य सुविधा मिळत नाहीत.
४. स्थलांतरित कुटुंबांसाठी असलेल्या सरकारी योजनांची अंमलबजावणी प्रभावी नसल्यामुळे, त्यांना त्याचा फारसा फायदा होत नाही.

**संशोधन पद्धती:**

**अ) प्राथमिक माहिती:**

१. **क्षेत्रीय अभ्यास:** नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर परिसरातील स्थलांतरित आदिवासी लोकांची मुलाखत घेतली.

२. **संवाद साधने:** स्थलांतरित कुटुंबांचे प्रत्यक्ष मुलाखती, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि गावकरी मंडळी यांच्याशी चर्चा केली.

**ब) द्वितीयक माहिती:**

१. न्यूज पेपर, न्यूज रिपोर्ट्स, सोशल मीडिया इंटरनेट यांचा आधार घेतला.

२. स्थानिक लोकांनी दिलेली माहिती.

**स्थलांतराचे प्रकार Types of Migration:**

१. हंगामी स्थलांतर (Seasonal Migration) – ४ ते ६ महिने रोजगार मिळवण्यासाठी स्थलांतर करतात.

**स्थलांतराचे परिणाम Impact of Migration:**

**अ) सकारात्मक परिणाम :**

१. आर्थिक उत्पन्न वाढ होते.

२. शहरी भागातील सुविधा उपलब्ध होतात.

**ब) नकारात्मक परिणाम:**

1. शिक्षण: स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण खंडित होते.
2. आरोग्य: स्थलांतरित मजुरांना आरोग्य सेवा मिळणे कठीण जाते.
3. संस्कृती: स्थलांतरामुळे आदिवासी संस्कृती आणि परंपरा धोक्यात येतात.

**स्थलांतर रोखण्यासाठी उपाय Solutions to Control Migration:**

1. **स्थानिक रोजगार निर्मिती:** आदिवासी भागात कृषी प्रक्रिया उद्योग, वनाधारित उद्योग, आणि कौशल्य विकास केंद्रे सुरू करणे, स्वयंरोजगारासाठी MSME आणि स्टार्टअप धोरणांचा लाभ द्यावा.
2. **शिक्षण आणि कौशल्य विकास:** तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालय व वसतीगृहाची संख्या वाढवावी आणि तरुणांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण सुरू करणे, कौशल्य विकास योजना राबवणे.
3. **शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी:** MGNREGA सारख्या योजनांचा प्रभावी वापर, वनहक्क कायद्याचा संपूर्ण लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करणे.
4. **महिला बचत गट आणि लघुउद्योग:** महिला स्वयंसहाय्यता गट स्थापन करून कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, हस्तकला, मध संकलन, औषधी वनस्पती प्रक्रिया यासारख्या पारंपरिक व्यवसायांना प्रोत्साहन देणे.

**निष्कर्ष Conclusion:**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी स्थलांतराचे मुख्य कारण म्हणजे आर्थिक अस्थिरता, शेतीतील अपयश, आणि स्थानिक रोजगाराच्या संधींचा अभाव. स्थलांतरामुळे आर्थिक लाभ मिळतो, पण सामाजिक आणि शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागते. स्थलांतर रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे, सरकारी योजनांचा प्रभावीपणे राबवायला पाहिजे, तसेच शिक्षण व कौशल्य विकास यावर भर देणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


- मोतिराम भोये. (२०२४) “रोजगारासाठी स्थलांतर, कधी संपणार वनवास” जिल्हा नाशिक दैनिक लोकणामा वर्तमान पेपर पान क्रमांक ७
- कुलकर्णी हेरंब (२०१९) दारिद्राची शोधयात्रा समकालीन प्रकाशन सदाशिव पेठ पुणे ३०
- सोमनाथ घोळवे (२०२४) दुष्काळामुळे स्थलांतराचा प्रश्न गंभीर सकाळ ॲग्रोवन रविवार विशेष पान क्रमांक १४ दिनांक- १४ जून २०२४
- नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर परिसरातील स्थलांतरित आदिवासी लोकांची मुलाखत घेतली.
- स्थलांतरित कुटुंबांचे प्रत्यक्ष मुलाखती, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि गावकरी मंडळी यांच्याशी चर्चा केली.
- न्यूज पेपर, न्यूज रिपोर्ट्स, सोशल मीडिया, इंटरनेट यांचा आधार घेतला.